फोन : २६०५४५१२
२६०५३२१५
फॅक्स : २६०५३२१५

महाराष्ट्र शासन (स्थापित)

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे
# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

**Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )**

स्थापना : २००३

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

**कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.**

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. / 3495 दिनांक : ०६/०३/२०२३

प्रति,

मे. युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी लि.,
२ रा मजला, नाना चेंबर्स, बँक ऑफ महाराष्ट्रवर,
कासारवाडी, पुणे-४११ ०३४.

**विषय :-** **सुरक्षा रक्षकांच्या दि. ०१/०१/२०२३ पासून देय असलेल्या वाढीव महागाई भत्त्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मंडळाने पु.जि.सु.र.मं./वेतन/पुर्ननिर्धारण/ठ.क्र.९१/२०१९ अन्वये सुरक्षा रक्षकांचे वेतन पुर्ननिर्धारित केले आहेत. संबंधित आदेशात नमूद केल्याप्रमाणे दि.०१/०१/२०२३ ते दि.३०/०६/२०२३ या कालावधींसाठी विशेष भत्त्यांचा दर मंडळाने निर्धारित केलेला असून, सदरच्या आदेशाची प्रत सोबत जोडून देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ मधील कलम २३ अन्वये सुट मिळालेल्या सुरक्षा रक्षकांची वेतनांवरील ३% लेव्ही मंडळात ५ तारखेच्या आंत दरमहा अदा करावी.

आपला विश्वासू,

सरकारी कामगार अधिकारी
तथा
सचिव
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन (स्थापित)

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे
# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )

स्थापना : २००३

फोन : २६०५४५१२
२६०५३२१५
फॅक्स : २६०५३२१५

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. /

दिनांक :

## आदेश

**विषय :-** पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा महागाई भत्ता दिनांक ०१ जानेवारी, २०२३ पासून करण्यात येणारी सुधारणा.

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते व इतर सेवा शर्ती पुर्ननिर्धारित ठराव क्र. ९१/२०१९ अन्वये निर्धारित केलेले आहे. मंडळाचे दि.१५/०६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये दि.१ एप्रिल, २०१९ पासून वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०१/०४/२०१९ रोजी सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित करतांना शासनाने 'दुकाने व व्यापारी आस्थापना' या अनुसुचित उदयोगासाठी वेळोवेळी जाहिर केलेला विशेष भत्ता सुरक्षा रक्षकांना लागू केलेला आहे. मंडळाने दि. ०१/०७/२०२२ ते दि.३१/१२/२०२२ या कालावधीत जाहिर केलेला विशेष भत्ता रू.२,१०६/- इतका लागू केलेला होता. शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांच्या दि.०१/०२/२०२३ रोजीच्या क्र.ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२३(१)/कार्या-१० अधिसुचनेनुसार "कोणत्याही दुकानांतील व व्यापारी आस्थापनेतील कामधंदा" या अनुसुचित उद्योगातील कामगारांचे दि.०१/०१/२०२३ ते दि.३०/०६/२०२३ या कालावधींसाठी विशेष भत्त्यांचे दर रू.२,४४४/- इतके निर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०७/०६/२०१९ रोजी केलेल्या ठराव क्र.९१/२०१९ नुसार केलेल्या वेतन पुर्ननिर्धारण आदेशात नमूद केल्याप्रमाणे उक्त नमूद अधिसुचना क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२३(१)/कार्या-१०, दि.०१/०२/२०२३ प्रमाण मानून दि.०२/०२/२०२३ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्त्यांत रू.२,४४४-२,१०६ = रू.३३८ वाढ करून दि.०१ जानेवारी, २०२३ ते दि. ३० जून, २०२३ या कालावधीकरीता दरमहा रू.६,१९८ + रू.३३८ = रू.६,५३६/- इतका निश्चित करून जाहिर करण्यात येत आहे.

(अभय प. गिते)
कामगार उपआयुक्त, पुणे
तथा
अध्यक्ष
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे

Scanned with OKEN Scanner